ISSN – 2347-7075
Impact Factor – 0.899
Vol.1No.6 July- Aug 2014

# स्त्री सक्षमीकरणासाठी समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून विविध शासकीय व पंचवार्षिक योजना, कायदे

**प्रा. शरद नामदेव बोरवडेकर**

*समाजशास्त्र विभाग,*

*गोपाळकृष्ण गोखले महाविदयालय, कोल्हापूर*

**प्रस्तावना:**

**स्त्री सक्षमीकरणासाठी विविध शासकीय योजना:**

स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्रियांच्या उन्नतीसाठी अनेक समाज सुधारकांनी विविध स्तरावर कार्य केले. स्वातंत्र्यप्राप्ती नंतर स्वतंत्र भारतामध्ये लोकशाही स्थापन करण्यात आली. समाजातील प्रत्येक घटकाचा विकास म्हणजे राष्ट्रविकास या धोरणातून महिलांसाठी विविध शासकीय योजना तयार करण्यात आल्या. महिला, बाल विकास अशा प्रकारे एक स्वतंत्र महिला विकास कक्ष स्थापन करण्यात आला. स्वतंत्र भारतात महिलांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यात आला व त्यानुसार पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून शासकीय योजनांचे आराखडे बनविण्यात आले. त्यानुसार आवश्यक आर्थिक तरतूद ही करण्यात आली.

स्वतंत्र भारतीय घटना तयार झाल्यानंतर १९५२ साली प्रथम सार्वत्रिक निवडणुका झाल्या. ह्या निवडणुकीत भारतातील २१ वर्षे पूर्ण केलेल्या सर्व स्त्री-पुरुषांना समान अधिकार प्राप्त झाला. जाती, धर्म, भाषा, लिंग, जन्मस्थान यावर आधारित असा कोणताही भेद त्यात केला नाही. १९५३ साली केंद्रीय समाज कल्याण परिषद स्थापन झाली. या परिषदेचे मुख्य उद्दिष्ट हे समाज कल्याण, महिला, मुले आणि समाजातील कनिष्ठ स्तरातील लोकांचा विकास करणे हा होता. विविध पंचवार्षिक योजनांच्याद्वारे महिलांच्या कल्याणासाठी काही कार्यक्रम निश्चित केले गेले.

**पहिली पंचवार्षिक योजना (१९५१-५६) :**

- प्रसूती आणि मुलांच्या आरोग्यासाठी काही केंद्र उघडणे व कुटुंब नियोजनाची व्यवस्था करणे.

**दुसरी पंचवार्षिक योजना (१९५६-६१) :**

- महिलांना, प्रसूती अवस्थेत सुरक्षितता हवी म्हणून त्याचा विचार झाला आणि लहान मुलांसाठी पाळणाघरांची व्यवस्था झाली.

**तृतीय पंचवार्षिक योजना (१९६१-६६) :**

- यात महिलांच्या शिक्षणावर विशेष लक्ष दिले गेले. कुटुंब नियोजनावर भर दिला गेला. गावात बाल कल्याण केंद्र उघडली गेली. महिलांना आरोग्याचे शिक्षण दिले गेले.

**चौथी पंचवार्षिक योजना (१९६७-७४) :**

- यामध्ये शिक्षण, आरोग्य आणि कुटुंब नियोजनाचे कार्यक्रम आखले

**पाचवी पंचवार्षिक योजना (१९७४-७९) :**

- कामावर जाणाऱ्या महिलांसाठी विशेष सुरक्षितता दिली गेली.

**सहावी पंचवार्षिक योजना (१९८०-८५):**

- महिलांना रोजगार मिळावा म्हणून काही योजनांची शिफारस केली गेली. महिलांना आर्थिक स्वातंत्र्य मिळावे यासाठी विशेष भर दिला गेला.

**सातवी पंचवार्षिक योजना (१९८५-९०):**

- महिलांना स्वतःबद्दल अधिक आत्मविश्वास निर्माण व्हावा म्हणून त्यांना अधिकार देण्यासाठी प्रयत्न झाले.

**सामाजिक कायदे :**

**विधवा पूनर्विवाह कायदा (१८५६) :**

भारतीय समाजात ७०-८० वर्षांपूर्वी मुलींचे फार लवकर विवाह होत असत. तिसऱ्या शतकांपर्यंत महिलांच्या जीवनाची अवस्था चांगली होती. त्यानंतर म्हणजे १० व्या शतकानंतर विधवांकडे पाहताना त्यांना अशुभ मानले जाई. त्यांच्यावर अत्याचार होत. महाराष्ट्र आणि बंगालमध्ये समाजसुधारकांनी, विधवांच्या पुनर्विवाहाचा प्रश्न धसास लावला. महर्षी धोंडो केशन कर्वे आणि ईश्वरचंद्र विद्यासागरांनी विधवेशी लग्न केले. इ. स. १८५६ साली विधवा पुनर्विवाह कायदा पास झाला. हिंदू विधवांना पुनः विवाह करण्यामागे जे कायद्याचे व शास्त्राचे अडथळे होते ते दूर करण्यासाठी ह्या कायद्याची मदत झाली.

- **सतीबंदी कायदा (१८२९) :**

इ. स. १८२९ मध्ये राजा राजमोहन रॉय यांच्या प्रयत्नामुळे सतीप्रथा बंद करण्याचा कायदा, लॉर्ड बेटिंगच्या काळात पास झाला. पूर्वी महिला पतीनिधनानंतर सती जात. त्यांना काही अस्तित्वच नसे. पतीबरोबर आपणही सहगमन केले पाहिजे ही रूढी १९ व्या शतकात होती. ती दूर करण्यासाठी रांजा राममोहन रॉय यांनी फार परिश्रम घेतले. सतीची सक्ती होत होती. त्या दृष्ट रूढीला या कायद्याने आळा बसला.

- **बालविवाह प्रतिबंध कायदा :**

विवाह ही स्त्रीच्या आयुष्यातील महत्त्वाची गोष्ट. बालविवाहाचे दुष्परिणाम लक्षात आल्याने विवाहाकरिता वयोमर्यादा असावी. ही गोष्ट लक्षात आली व त्यादृष्टीने जो कायदा पास झाला तो बालविवाह प्रतिबंधक कायदा. इ.स. १९२९ साली बालविवाह प्रतिबंधक कायदा पास झाला. ह्या कायद्याप्रमाणे १६ वर्षे वयाच्या आतील मुलीशी लग्न केले तर तो गुन्हा असे तसेच १८ वर्षे वयाच्या खालील मुलीला कायदेशीर विवाहाकरिता वडिलांची संमती असणे आवश्यक होते. यालाच 'शारदा कायदा' म्हणतात.

- **हिंदू विवाह कायदा (१९५६) :**

स्वातंत्र्योत्तर काळात १९५६ साली हिंदू विवाह कायदा अस्तित्वात आला. हिंदू कायदा हा हिंदू धर्म मानणाऱ्या व्यक्तीस लागू आहे. वीरशैव लिंगायत, बौद्ध, जैन, शीख, ब्राह्मो व आर्य समाज ह्या अनुयायींना लागू आहे. ज्या हिंदूंचे विवाह हे स्पेशल मॅरेज ॲक्टनुसार केले जात नाहीत त्या सर्वांना हा कायदा लागू होतो.

- **द्विभार्याप्रतिबिंधक कायदा (१९५५) :**

१९५५ च्या हिंदू विवाह कायद्याने परंपरागत हिंदू विवाह पद्धतीत अनेक बदल केले आहेत. द्विभार्या चालीवर कायद्याने बंदी आहे. ह्या कायद्यानुसार प्रथम पत्नी जिवंत असताना एखाद्या पुरुषाने दुसरा विवाह केला तर इंडियन पीनल कोडखाली तो शिक्षापात्र गुन्हा ठरतो. दुसऱ्या पत्नीला पत्नीचा दर्जा प्राप्त होत नाही. त्यामुळे अशा स्त्रीला पतीच्या मालमत्तेत कसलाच हक्क मिळू शकत नाही व अशा विवाहापासून होणारी मुलेही अनौरस समजली जातात. प्रथम पत्नी व तिची औरस मुले ही पतीच्या मालमत्तेची वारसदार ठरतात.

- **नोंदणी विवाह कायदा (१८७२ १९५४) :**

इ. स. १८७२ साली नोंदणी विवाहाचा नवा कायदा पास झाला. ह्या कायद्यानुसार वधू-वर हे नोंदणी विवाह करून आपल्या इच्छेनुसार धार्मिक विधी किंवा विवाह-समारंभ साजरे करू शकतात. ह्या कायद्यानुसार

मुलीच्या विवाहाची वयोमर्यादा ही १८ केली आहे. विवाहाची नोटीस ही एक महिना आधी द्यावी लागते. हा कायदा विवाहाची साधी पद्धत सर्व भारतीयांना उपलब्ध करून देते.

- **घटस्फोटाचा कायदा (१९५५) :**

१९५५ च्या हिंदू विवाह कायद्याने कायदेशीर विभक्तपणा व घटस्फोट ह्या दोन गोष्टी मान्य केल्या आहेत. पती पत्नीचे नाते हे घटस्फोटात संपुष्टात येते. त्यानंतर १९७६ साली हिंदू कायद्यात दुरुस्ती केली गेली. व्यभिचार, क्रूर वागणूक, वेड लागणे, गुप्त रोग, धर्मांतर, संन्यास, बेपत्ता होणे अशा कारणांनी पतीला अथवा पत्नीला घटस्फोट मागता येतो.

- **पोटगी कायदा (१९४६ ते ५६) :**

इ. स. १९४६ मध्ये हिंदू विवाहित स्त्रियांना विभक्त राहून पोटगी मागण्याचा हक्क हा कायदा पास झाला. त्यानंतर १९५६ साली पोटगीच्या कायद्यात आणखी काही तरतुदी सुचविण्यात आल्या. १९४६ चा कायदा रद्द झाला. १९५६ चा कायदा योग्य मानला जातो. ह्या कायद्यानुसार काही विशिष्ट हिंदू व्यक्तींना विशिष्ट परिस्थितीत पोटगी मागता येते. विवाहित हिंदू स्त्रीला ह्या कायद्यानुसारच विशिष्ट परिस्थितीत पतीपासून विभक्त राहून पोटगी मागण्याचा हक्क दिलेला आहे.

- **हुंडा प्रतिबंधक कायदा (१९६१) :**

आधुनिक काळात हुंड्याचे आकडे दिवसेंदिवस वाढत चाललेले दिसतात. मोठ्या नोकऱ्या, गलेलठ्ठ पगार, गावातले दवाखाने, परदेशगमन, मुलाच्या शिक्षणासाठी झालेला खर्च हे सर्व विवाहामध्ये वधू-पित्याकडून काढण्याची दृष्ट प्रथा दिवसेंदिवस वाढतच आहे. वधू-पित्याचे हे एकप्रकारे शोषणच आहे. हुंडा दिला नाही तर विवाहानंतर मुलीचा छळ होतो व तिचा हुंडाबळीही घेतला जातो. ह्या दृष्ट रूढीला आळा बसावा म्हणून १९६१ साली हुंडाबंदी कायदा पास झाला. पण त्या कायद्याचे उद्दिष्ट सफल झालेले दिसत नाही. लोकशिक्षण व समाज परिवर्तन ह्या दोन माध्यमांनीच ही दुष्ट रूढी नाहीशी होऊ शकेल.हुंडाबळीच्या कायद्यात १९८४ मध्ये बरेच बदल करण्यात आले.

- **भा.दं.वि कलम ४९८ अ :**

ह्या कलमात महिलांवर होणाऱ्या छळाची व्याख्या दिली आहे. एखाद्या विवाहित महिलेस तिच्या नवऱ्याने किंवा नवऱ्याच्या नातेवाइकाने मुद्दाम जाणीवपूर्वक अशी वागणूक दिली की ज्यामुळे ती विवाहित महिला त्या छळाला कंटाळून आत्महत्या करण्यास किंवा शारीरिक इजा करून घेण्यास प्रवृत्त होईल, अशा

प्रकारच्या छळास व जाचास तिच्या नवऱ्यांस व तिला छळणाऱ्या नातेवाइकास ३ वर्षेपर्यंत शिक्षा व दंड होऊ शकतो. या जाचात व छळात शारीरिक व मानसिक जाचाचा समावेश केला आहे.

- **भा.दं.वि कलम ३०४ ब :**

या कलमामध्ये हुंडाबळीची व्याख्या दिली आहे. "जर एखाद्या स्त्रीचा मृत्यू हा तिच्या लग्नानंतर १ वर्षाच्या आत जाळून किंवा अनैसर्गिक परिस्थितीत झाला असल्याचे सिद्ध झाले आणि तिच्या मरणाअगोदर तिचा नवरा किंवा सासरचे लोक हुंड्यासाठी किंवा हुंड्यासंबंधी तिचा 'छळ' करीत होते, असे सिद्ध झाले तर अशा मृत्यूस हुंडाबळी समजावे. हुंडाबळीसाठीची शिक्षा म्हणून सात वर्षेपर्यंत शिक्षा व दंडाची तरतूद केलेली आहे."

- **भा.दं.वि कलम ३०६ :**

भारतीय पुरावा कायद्याचा कलम '११३ अ' नुसार जाच किंवा छळ सिद्ध झाल्यास आणि विवाहित महिला तिच्या लग्नापासून ६ वर्षांच्या आत आत्महत्या करून मरण पावली असे सिद्ध झाल्यास, कोर्ट असे गृहीत धरते की, तिच्या नवऱ्याने किंवा त्याच्या कुटुंबीयांनी त्या स्त्रीला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले आणि तिच्या आत्महत्येस मदत केली. अशा परिस्थितीत आरोपींना भादंवि कलम ३०६ प्रमाणे १० वर्षेपर्यंत शिक्षा व दंडाची तरतूद केलेली आहे.

- **मुलींचा अनैतिक व्यापार विरोधी कायदा (१९५६) :**

भारताने इ. स. १९५६ साली स्त्रियांच्या व मुलींच्या अनैतिक व्यापाराला आळा घालण्यासाठी हा कायदा लागू केला. इ. स. १९५० साली न्यूयॉर्कमध्ये 'व्यक्तींचा वापर व वेश्या व्यवसायाचा' इतर लोकांकडून आपल्या फायद्यासाठी उपयोग यांना आळा घालण्याच्या उद्देशाने एक आंतरराष्ट्रीय परिषद भरली होती. तिचा ठराव भारताने मान्य केल्यामुळे १९५६ साली हा कायदा पास झाला. ख्रिस्ती जोगिणी (नन्स) होण्यासाठी शेकडो मुली पश्चिम युरोपीय देशात पाठवून अनेक लोक गब्बर झाले. लग्नाच्या नावाखाली अनेक मुलींना फसविले गेले व त्यांचा अनैतिक व्यापार त्यांनी सुरू केला. तारुण्याच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या हजारो कन्यांची कत्तल ह्या अनैतिक व्यापारातून होते. मुलींचा असा अनैतिक बेकायदेशीर व्यापार करणाऱ्या व्यक्तीस सक्तमजुरीची जबर शिक्षा होऊ शकते.

- **दत्तक घेण्याचा हक्क (१९५६) :**

पूर्वी स्त्रियांना दत्तक घेण्याचा हक्क नव्हता पण आता दत्तक घेण्याचे दार स्त्रीला कायद्याने मोकळे झाले आहे. कोणताही पुरुष आपल्या पत्नीच्या संमतीशिवाय दत्तक घेऊ शकत नाही. अविवाहित स्त्री, विधवा स्त्री

दत्तक घेऊ शकते. दत्तक विधानाला मुलगाच हवा ही अट नाही. आता मुलगीदेखील दत्तक घेता येते. १९५६ साली दत्तक कायदा पास झाला.

- **वेश्याव्यवसाय प्रतिबंधक कायदा (१९५६) :**

हा कायदा १९५६ साली पास झाला. अल्पवयीन मुलींच्या वेश्यांच्या धंद्यात होणाऱ्या नवीन भरतीला त्यामुळे पुष्कळच आळा बसला. ह्या कायद्यानुसार कोणत्याही स्त्रीची ह्या व्यवसायात राहण्याची इच्छा नसेल तर तिची त्वरित सुटका होऊन तिला तात्पुरते आश्रयस्थान मिळू शकते.

- **गर्भपाताचा कायदा (१९७२) :**

मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेग्नन्सी बिल १९७१ हा कायदा, १ एप्रिल १९७२ पासून अंमलात आला. ह्या कायद्यानुसार भारतातील सर्वधर्मीय स्त्रियांना प्रथमच काही विशिष्ट परिस्थितीत गर्भपात करून घेण्याचा हक्क प्राप्त झाला आहे. १९७२ पूर्वी कायद्याने गर्भपाताला बंदी होती. ह्या कायद्यानुसार कोणत्याही सज्ञान स्त्रीला स्वतःच्या इच्छेनुसार गर्भपात करून घेणे शक्य आहे. त्यासाठी पत्नीच्या संमती जरूरी नाही. पती वा इतर कुणाही नातेवाइकांच्या इच्छेनुसार कोणत्याही स्त्रीवर गर्भपात लादता येणार नाही.

- **गर्भजल परीक्षा विरोधात कायदा (१९८८) :**

हा कायदा १९८८ साली पास झाला. गर्भजलाची परीक्षा करून, त्यांच्या आधारे गर्भ हा स्त्री का पुरुषाचा आहे, ह्याचे निदान करणे हे बेकायदेशीर आहे. स्त्रीचे आरोग्य चांगले राहाण्यासाठी असा कायदा असणे आवश्यक आहे.

- **मुंबई देवदासी संरक्षण कायदा (१९३४) :**

देवदासी प्रथेचे निर्मूलन करण्याकरिता आणि देवदासींना संरक्षण देण्यासाठी हा कायदा करण्यात आला. देवदेवतांना समर्पण केलेली अविवाहित हिंदू स्त्री अशी देवदासी राष्ट्राची व्याख्या केलेली आहे. या कायद्यानुसार देवदासी करण्यासंबंधीचा कोणताही विधी रूडी किंवा नियम, स्वीची संपती असली तरीही बेकायदेशीर ठरविण्यात आले. पण हा कायदा केलेल्या असूनही आज कर्नाटक राज्यात सत्तम्मा देवीला दरवर्षी ६०० मुली बाहिल्या जातात.

- **बलात्कारासंबंधीचा कायदा:**

१९८३ मध्ये लोकसभेने भारतीय दंड संहिता फौजदारी प्रक्रिया संहिता १९७२ व १९७३ च्या भारतीय पुराव्यासंबंधीच्या कायद्यात दुरुस्ती करण्याकरिता हा कायदा संमत केला आहे. एखाद्या पुरुषाने एखाद्या स्त्रीशी तिच्या संमतीशिवाय संभोग केला तर त्या परिस्थितीत त्या पुरुषाने बलात्काराचा गुन्हा केला हे समजले जाते.

स्त्रीच्या संमतीशिवाय किंवा स्त्रीच्या इच्छेविरुद्ध, स्त्रीची संमती, तिच्या किंवा तिच्या हितसंबंधीच्या मृत्यूची वा त्यांना इजा करण्याची भीती दाखवून मिळवली असेल तर, अर्धवट मानसिकतेमुळे, तसेच मादक पदार्थांच्या सेवनामुळे चढलेल्या धुंदीत संमती दिली असेल व ही संमती देताना त्याच्या परिणामांची कल्पना आली नसेल तर, जर तिने संबंधित पुरुष हा कायदेशीर नवरा आहे, असे समजून संमती दिली असेल आणि त्याचवेळी त्या स्त्रीला माहीत नसेल की तो तिचा नवरा नाही. स्त्रीचे वय १९ वर्षांच्या आत असेल तर तिची संमती असो वा नसो, त्या आरोपीवर बलात्काराचा गुन्हा नोंदवला जातो. बलात्कार करणाऱ्याला कमीत कमी ७ वर्षांची सक्तमजुरी व दंडाची शिक्षा होते. परंतु बलात्कार जर सामूहिकरित्या केला असेल तर मात्र, जन्मठेपेची किंवा कमीत कमी दहा वर्षे सक्त मजुरीची व दंडाची शिक्षा सांगितली आहे.

बलात्कार करणाऱ्या गुन्हेगारास फाशी द्यावी, असा एक विचार केंद्रापुढे आहे. हा विचार कितीही स्तुत्य असला तरी फिर्याद करणाऱ्या सर्वच महिला या प्रामाणिक व खरे बोलणाऱ्या असतील, असे नाही. त्यामुळे एखाद्या निरपराध व्यक्तीस दुसऱ्या काही खाजगी भांडणामुळे बलात्काराचा आरोप करून तो फाशीवर जाण्याचा धोका आहे. या कारणामुळे या कायद्यास अनेक नागरिकांचा विरोध आहे.

**समारोप:**

महिला सक्षमीकरणासाठी शासन पातळीवर विविध प्रयत्न करण्यात आले आहेत. शासकीय योजना, कायदे, सवलती, सक्षमीकरणास पूरक नियोजन, महिलांचा सकारात्मक प्रतिसाद व समाजाची मानसिकता या सर्वच प्रयत्नांतून स्त्री सक्षमीकरण यशस्वी होऊ शकते.

**संदर्भग्रंथ सूची:**

१. आपटे, रोडे : (२०१२) 'भारतातील महिला विकासाची वाटचाल', डायमंड प्रकाशन,. पुणे.

२. आप्पाराव : (२००२) 'आंध्रप्रदेशातील महिला सक्षमीकरणात बचत गट आणि ग्रामीण स्त्रियांचा अभ्यास'.

1. ३.उडवी, पोर्णिमा/सुंदरराव (२००८) 'बचतगटांचे परिणामकारक संघटना हे महिलांच्या सक्षमीकरण प्रक्रियेतील एक साधन आहे’.

३. कवी, माधवी: (२०००) 'महिला कल्याण आणि विकास', विद्याप्रकाशन नागपूर.

४. कदम, प्रभा: (२००६) 'सातारा जिल्ह्यातील महिलांना आर्थिक, सामाजिक राजकीय व कायदेशीरदृष्ट्या सक्षम बनण्यासाठी महिला बचत गटांची भूमिका अभ्यास'

५. कोलते, पुंडलिक (२०१२) ‘पंचायत राज व्यवस्थेत महिलांचा सहभाग', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

६. चाळके, शोभा : (२०११) 'भारतीय स्त्रीयांचे स्वातंत्र्य', निर्मिती प्रकाशन,कोल्हापूर.